# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)

# नागरिकांची सनद

सन-२०२२-२३

# मनोगत

कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर या महामंडळ अधिनस्त असलेल्या नागपूर व अमरावती येथील प्रादेशिक कार्यालयातंर्गत कार्यरत असलेल्या कार्यालयाकडून पुरविण्यात आलेल्या सुविधा साठीच्या योजना व त्याची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत तसेच लाभधारक शेतकऱ्यांपर्यंत राज्य शासनाच्या धोरणानुसार पोहचविण्याच्या दृष्टीने नागरीकाची सनद ही पुस्तिका प्रकाशीत करण्यात येत आहे.

जलसंपदा विभाग हा राज्याच्या सर्वांगीन विकासासाठी रचनात्मक आणी पायाभुत सुविधा निर्माण करण्याकरिता तसेच नागरीकाच्या विशेषत: शेतकऱ्यांसाठी उत्तमोत्तम सिंचनाच्या,पिण्याच्या पाण्यासाठी त्याचबरोबर विविध कारणासाठी मोठे, मध्यम, लघु प्रकल्पाची कामे गुणवत्तापुर्वक विहीत कालावधीत शासनाचे धोरणानुसार पुर्ण करण्यास उत्तरदायी व कटीबध्द आहे.

नागरीकाच्या या सनदेव्दारे शासनाचा हा विभाग पारदर्शी होवुन जलसंपदा कार्यालयातंर्गत जलसिंचन योजना बाबत राबविण्यात येणाऱ्या योजनाची माहिती व्हावी तसेच शासन व जनता यांचेमध्ये सलोख्याचे व जिव्हाळयाचे संबंध प्रस्थापित व्हावेत या दृष्टीने हया कार्यालयाची पुस्तीका प्रकाशीत करण्यात येत आहे.

# प्रस्तावना

कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर हे महामंडळ महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे. हे महामंडळ खालील सुविधा पुरविण्यात बांधील आहे. ही बांधीलकी हे महामंडळ या सनदेद्वारे जाहीर करीत असून, ती स्विकारत आहे. सार्वजनिक सेवा तत्परतेने, सौजन्यपुर्वक व सन्मानपुर्वक वागणूक मिळून उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामायिक प्रश्न सहानुभूतीपुर्वक सोडवावे हा दृष्टीकोन ही सनद तयार करताना नजरेसमोर ठेवला आहे.

जलसंपदा विभागाचा संबंध मुख्यत्वेकरुन शेतकऱ्यांशी येतो. तरी पण जलसंपदा विभागाशी संबंधित विषयातील माहिती समाजातील कोणीही सर्वसामान्य जागरूक नागरिक, स्वयंसेवी संस्था शेतकरी किंवा कंत्राटदार इत्यादींना मिळवून घेण्याची इच्छा असू शकते. जलसंपदा विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या या नागरिकांच्या सनदेच्या मुख्य उद्देश्य हा वरिल संबंधित माहितीचे स्वरूप काय असेल, ही माहिती कोणत्या कार्यालयाकडे/ अधिकाऱ्यांकडे मिळेल, मिळण्यासाठी किती कालावधी लागेल याची निश्चित ग्वाही देणे व त्याप्रमाणे अंमलबजावणी करणे हा आहे.

१) शेतकऱ्यांना मुख्यत्वेकरून सिंचनाच्या पाणी आवर्तनाबाबत जाहीर प्रगटनाद्वारे माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. तसेच विविध पाणी अर्जाची उपलब्धता, सिंचन विषयक बाबी, पाणीपट्टीचा भरणा, उपसा सिंचनाची माहिती त्या त्या स्तरावर मुख्यत्वेकरून शाखा अभियंता स्तरावर शेतकऱ्यांना उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने संबंधित माहिती यात अंतर्भुत करण्यात आली आहे.

२) शहरी भागातील तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना, शेतकऱ्यांना, कारखानदार व्यावसायिकांना व स्वयंसेवी संस्थांना जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील मोठे, मध्यम व लघु प्रकल्पाच्या धरणाच्या पाण्याच्या दैनंदिन उपलब्धतेबाबतची तसेच पिण्याचे पाण्याचे, औद्योगिक पाणी पुरवठयाचे किंवा सिंचनाच्या पाणी पुरवठयाच्या आवर्तनाबाबतच्या दैनंदिन माहितीची आवश्यकता भासू शकते. त्यादृष्टीने संबंधित जिल्हयातील, तालुक्यातील, प्रदेशातील, राज्यातील उपलब्ध पाणी साठयाची त्या दिवशीची माहिती त्याचप्रमाणे त्या दिवशी चालू असलेल्या पाण्याच्या आवर्तनाबाबतची स्थूल माहिती यांचा समावेश यांत करण्यात आला आहे.

३) सार्वजनिक निधीमधून जलसंपदा विभागातील प्रकल्पांची काम तसेच परिक्षण व दुरूस्तीची कामे करण्यात येतात. काही स्वयंसेवी संघटना व जागरूक नागरिक तसेच कंत्राटदार इत्यादींना संबंधित जिल्हयामध्ये संबंधित तालुक्यामध्ये कोणत्या प्रकारची मोठे, मध्यम लघु प्रकल्पांच्या कामांच्या निविदा काढण्यात आलेल्या आहेत. व त्या निविदाबाबतची सद्य:स्थिती काय आहे या माहितीची आवश्यकता भासू शकते. त्या दृष्टीने याबाबतची माहिती यात अंतर्भुत केली आहे.

४) सर्वसाधारण एक विशिष्ट जिल्हयातील, तालुक्यातील जलसंपदा प्रकल्पांच्या बांधकामाची सद्यस्थिती यापुर्वी संबंधित जिल्हयात पूर्ण झालेल्या मोठे, मध्यम ,लघु प्रकल्पाविषयीची माहिती तसेच भविष्यकालीन प्रकल्पाबाबतची माहिती या बाबींचा देखील समावेश यांत केला आहे.नागरिकांच्यासाठी सदरची माहिती त्यात्या स्तरावर किमान स्थुल स्वरूपात तात्काळ उपलब्ध असणे त्या दृष्टीने आवश्यक आहे.